पाहिजेत
दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com
www.attalmat.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-२८२ ■ शुक्रवार, दि. १७ जानेवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -282 ■ Friday, 17 Jan 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## प्रजासत्ताक दिनी मिळणार लाडक्या बहिणींना जानेवारीचा हफ्ता

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी समोर येत असून जानेवारी महिन्याचा हफ्ता मिळण्याची तारीख समोर आली आहे. लाडक्या बहिणींना २६ जानेवारी रोजी या महिन्याचा हफ्ता मिळणार असल्याचं राज्याच्या मंत्री आदिती तटकरे यांनी जाहीर केले आहे. या संबंधी माहिती देताना आदिती तटकरे म्हणाल्या की, २६ जानेवारीच्या आधी जानेवारी महिन्याचा लाभ मिळेल असा प्रयत्न सुरू आहे. यासाठी ३,६९० कोटींचा निधी आम्हाला मिळणार आहे. अर्थसंकल्पाच्यावेळी देखील महिलांना लाभ कसा मिळेल याची तरतूद आम्ही करणार आहोत. आदिती तटकरे म्हणाल्या की, आम्ही फेब्रुवारीचे नियोजनसुद्धा करत आहोत. लाडकी बहीण योजनेचा लाभ आम्ही २ कोटी ४६ लाख महिलांना दिला. काही महिलांबाबत तक्रार आली होती. ड्युप्लिकेशन झालेल्या केसेस कमी होत्या. त्यामुळे फार काही फरक पडेल असे मला वाटत नाही. थोड्या फार कमी होतील.

## वांद्रे पोलिसांच्या कार्यक्षम तेवर प्रश्नचिन्ह? वॉचमनने पकडून दिलेल्या चोराला पोलिसांनी सोडून दिले!

**वांद्रे :** सैफ अलीखान हल्लेच्या प्रकरणानंतर आता वांद्रे परिसरातून धक्कादायक अपडेट समोर आली आहे. सैफ्फ अलीखान राहत असलेल्या इमारतीच्या नजीकच्या इमारतीत ५ जानेवारी रोजी दोन अज्ञात चोरांपैकी सुरक्षारक्षकाने एकाला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले मात्र दुसरा हातातून निसटला असल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान पकडलेल्या चोराला पोलिसांनी सोडून दिल्यामुळे त्या चोराने पुन्हा त्याच इमारतीत घुसण्याचा प्रयत्न करत इमारतीच्या सीसीटीव्ही कॅमेरा सोबत छेडछाड केली.

वांद्रे पश्चिमेतील हाय सोसायटी असलेल्या स्कायपर टॉवरमध्ये ५ जानेवारी रोजी दोन अज्ञात चोरांनी शिरकाव केला. चोर शिरल्याचे समजताच सुरक्षारक्षकांनी सावधानगिरी बाळगत हुशारीने एका चोराला पकडलं आणि १०० नंबर वर फ्फोन करत चोराला पोलिसांच्या हवाली केलं मात्र त्याचा काहीच उपयोग झाला नाही. पोलिसांनी त्या चोराला सोडून दिले. आणि १२ जानेवारीला परत त्याच दोन चोरांनी त्याच इमारतीत घुसून सीसीटीव्ही कॅमेरा सोबत छेडछाड केली असल्याची माहिती समोर आली आहे. त्याचबरोबर इमारतीच्या मालकाला सुद्धा त्यांनी धमकावलं. दरम्यान वांद्रे परिसर सामान्यांसाठी तरी सुरक्षित आहे का असा प्रश्न उपस्थित केला जातोय.

# आठव्या वेतन आयोगाची मुहूर्तमेढ; लाखो कर्मचारी सेवानिवृत्तांसाठी गूडन्यूज

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

केंद्र सरकारने आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेला मंजुरी देऊन देशातील एक कोटींहून अधिक केंद्रीय कर्मचारी व निवृत्तीधारकांना गुरुवारी खूश केले. नवा वेतन आयोग नेमका कधी स्थापन केला जाईल हे अजून स्पष्ट झाले नसले तरी एका वर्षात आयोगाला शिफ्फारशी सादर कराव्या लागणार आहेत. आयोगाचा अध्यक्ष व दोन सदस्यांची लवकरच नियुक्ती केली जाईल, असे केंद्रीय माहिती व प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत सांगितले.

केंद्रीय कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी, महागाई भत्ता, अन्य आर्थिक लाभ, निवृत्तिवेतन आदींचा दर १० वर्षांनी फ्फेरआढावा घेतला जातो.

वाढती महागाई लक्षात घेऊन वेळोवेळी महागाई भत्त्यामध्ये वाढ केली जाते. मात्र, काळानुसार कर्मचाऱ्यांचा जीवनस्तर कायम राखण्यासाठी त्यांच्या वेतनश्रेणीमध्येही बदल करण्याची गरज असते. त्यासाठी वेतन आयोगाच्या माध्यमातून केंद्र सरकारकडून केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीचा फेरआढावा घेतला जातो.

मनमोहन सिंग यांच्या सरकारच्या काळात सातव्या वेतन आयोगाच्या शिफ्फारशी लागू करण्यात आल्या होत्या. ही मुदत पुढील वर्षी २०२६ मध्ये संपत असल्यामुळे त्याआधी नव्या वेतन आयोगाला केंद्र सरकारकडे अहवाल द्यावा लागेल. वास्तविक, वेतन आयोगाला शिफ्फारशी सादर करण्यासाठी दीड-दोन वर्षांचा कालावधी लागतो. मनमोहन सिंग सरकारने वेतन आयोग स्थापन केल्यानंतर १८ महिन्यांनी अहवाल सादर झाला होता. यावेळी मात्र नव्या वेतन आयोगाला जेमतेम वर्षभराचा कालावधी मिळू शकेल.

**आतापर्यंत सात आयोग**

१९४७ पासून सात वेतन आयोग स्थापन करण्यात आले. त्यापैकी याआधीचा आयोग २०१६ मध्ये लागू करण्यात आला. ७ व्या वेतन आयोगाचा कार्यकाळ २०२६ मध्ये संपत आहे. नव्या वेतन आयोगाची प्रक्रिया २०२५ मध्ये सुरू केल्याने या आयोगाकडे केंद्र सरकारला शिफारशी सादर करण्यासाठी पुरेसा वेळ मिळू शकेल, असे वैष्णव म्हणाले. नव्या वेतन आयोगाच्या स्थापनेसंदर्भात केंद्रीय सरकारी कर्मचारी आणि कामगार म हासंघाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिले होते. तातडीने वेतन आयोग स्थापन केला जावा तसेच, वेतनश्रेणीचा १० वर्षांत नव्हे तर दर ५ वर्षांत फेरआढावा घेतला जावा. महागाई वाढत असताना दहा वर्षांचा कालावधी योग्य नाही, असे संघटनेचे म्हणणे होते.

### राज्य कर्मचाऱ्यांचीही मागणी

मुंबई : केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी आठवा वेतन आयोग नेमण्याच्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयानंतर राज्यातही आठवा वेतन आयोग लागू करावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघातर्फे गुरुवारी करण्यात आली आहे. केद्रामध्ये ज्या तारखेपासून आठवा वेतन आयोग लागू होईल, त्याच दिनांकापासून महाराष्ट्र शासनाने या निर्णयाची राज्य सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी अंमलबजावणी करावी, अशी मागणी राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे संस्थापक ग. दी. कुलथे यांनी केली आहे.

### ७० वर्षांचा वेतन इतिहास

- **पहिला आयोग** (१९४६-४७)किमान वेतन ५५ रुपये, कमाल वेतन दोन हजार; कर्मचारी १५ लाख
- **दुसरा आयोग** (१९५७-५९) किमान वेतन ८० रूपये, समाजवादी रचनेचा पाया. २५ लाख कर्मचारी
- **तिसरा आयोग** (१९७०-७३) किमान वेतन १८५ रुपयांची शिफारस. तीस लाख कर्मचारी
- **चौथा आयोग** (१९८३-८६) किमान ७५० रुपये वेतनाची शिफारस. ३५ लाख कर्मचारी लाभार्थी
- **पाचवा आयोग** (१९९४-९७)किमान २५५० रुपये वेतन शिफारस, चाळीस लाख कर्मचारी
- **सहावा आयोग** (२००६-०८) श्रेणीनुसार वेतनमान पद्धत. किमान वेतन सहा हजार तर कमाल ८० हजार
- **सातवा आयोग** (२०१४- १६) किमान वेतन १८ हजार कमाल वेतन अडीच लाख. एक कोटीहून अधिक कर्मचारी (निवृत्तिवेतन धारकांसह).

## शस्त्रक्रियेनंतर सैफची प्रकृती स्थिर; तपासासाठी दहा पथके ; एक कोटीची मागणी करत सैफवर हल्ला

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

अकराव्या मजल्यावरील शौचालयाच्या खिडकीतून आत शिरलेल्या अज्ञात व्यक्तीने एक कोटीची खंडणी मागत केलेल्या हल्ल्यात अभिनेता सैफ अली खान गंभीर जखमी झाला. हल्लेखोराने सैफ्फवर सहा वार केले असून त्यापैकी दोन जखमा गंभीर आहेत. हल्ला केल्यानंतर पळून गेलेल्या या तरुणाचा शोध सुरू आहे. या हल्ल्यात सैफसह त्याच्या घरातील दोन महिला कर्मचारीही जखमी झाल्या आहेत.

हल्लेखोराची ओळख पटली असून याप्रकरणी तपासासाठी मुंबई पोलिसांनी १० पथके तयार केली आहे. सैफ्फ अली खानच्या निवासस्थानी चोरीच्या उद्देशाने एका व्यक्ती शिरली होती. त्याने सैफवर हल्ला केला, अशी माहिती पोलीस उपायुक्त(परिमंडळ-९) दीक्षित गेडाम यांनी दिली. सैफच्या घरी गेल्या काही दिवसांपासून फरशी पॉलिश करण्याचे काम सुरू होते. त्यासाठी नियमित येणाऱ्या कामगारांची चौकशी करण्यात आली. आतापर्यंत या गुन्ह्याम गे चोरी हाच संशयास्पद हेतू असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. दरम्यान, न्यायवैद्याक तज्ज्ञांनी घटनास्थळी जाऊन तपासणी केली आहे. आरोपीला पहिल्यांदा पाहणारी महिला कर्मचारी लिमा यांची वांद्रे पोलिसांनी चौकशी करून त्यांच्याकडून घटनेची माहिती घेतली आहे. त्यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला आहे.

**मुलाच्या खोलीतून प्रवेश**

एका खोलीत सैफ व करीना राहतात. दुसऱ्या खोलीत तैमुर व त्याची आया लिना व तिसऱ्या खोलीत सैफचा धाकटा मुलगा जहांगीर उर्फ जयबाबा, एक नर्स लिमा व आया जुनु राहतात. आगीपासून संरक्षण करण्यासाठी इमारतीत असलेल्या जिन्यावरून आरोपी चढून आला व सैफ्फचा धाकटा मुलगा जहांगिरच्या खोलीतील शौचालयाच्या खिडकीतून घरात शिरला. त्यावेळी घरात शिरलेल्या अनोळखी व्यक्तीला पाहून सैफ्फ अली खानच्या घरात काम करणारी एरियामा फ्फिलिप्स ऊर्फ लिमा या सैफ्फचा मुलगा जहांगीर याला उचण्यासाठी पान ३ वर

# थंडीचा जोर ओसरला, राज्यात ढगाळ वातावरण

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



गेल्या काही दिवसांपासून राज्यात थंडीचा कडाका कमी झालेला दिसून येतोय. राज्यात ढगाळ वातावरण मात्र कायम आहे. अनेक ठिकाणी मळभाचे वातावरण तयार झाले आहे.आजही अनेक ठिकाणी ढगाळ वातावरण कायम असणार आहे. कमाल तापमानातही २ ते ३ अंशानी वाढ होणार असल्याची शक्यता आहे.

गेल्या काही दिवसांपासून देशासह राज्यामध्येही तापमानाम ध्ये चढउतार होत आहे. दरम्यान, पुढील काही दिवस हवामान असेच राहणार असल्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे. विदर्भ तसेच उत्तर महाराष्ट्रात पावसाच्या हलक्या सरी कोसळण्याची शक्यता असल्याचे हवामान खात्याकडून सांगण्यात आले आहे. अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे वाऱ्यांची स्थिती बदलली आहे. यामुळे तापमानामध्ये चढउतार पाहायला मिळत आहे. दरम्यान, या अशा वातावरणातील बदलांम ुळे राज्यातील शेतकऱ्याच्या चिंतेत भर पडली आहे. ढगाळ वातावरण अथवा अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान होण्याची चिंता शेतकऱ्याला सतावत आहे.

दुसरीकडे उत्तर भारतात हिमवृष्टी होत आहे. तेथील अनेक राज्यांमध्ये कडाक्याची थंडी तसेच धुक्याची चादर पाहायला मिळत आहे. उत्तर भारतात थंडीचा कडाका कायम असला तरी राज्यात मात्र दिवसा तापमानात वाढ पाहायला मिळत आहे.

## आका हा सोपा आका नाही, ठराविक लोकांना प्रत्येक महिन्याला पैसे देत होता

### आमदार सुरेश धस यांचा गंभीर आरोप

**बीड (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी अपहरण करून हत्या करण्यात आल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर संपूर्ण राज्यात मोठी खळबळ उडाली. यानंतर या प्रकरणातील आरोपींना पोलिसांनी अटक केलं. मात्र, या हत्येच्या घटनेतील एक आरोपी अद्यापही फ्फरार आहे. तसेच खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडसह हत्या प्रकरणातील आरोपींवर म कोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आल्यानंतर वाल्मिक कराडला एसआयटीने ताब्यात घेतलं असून न्यायालयाने आता सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, संतोष देशमुख हत्या प्रकरणात उज्ज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्याची मागणी भाजपा आमदार सुरेश धस यांनी केली होती. आता याबाबत मुख्यमंत्री लवकरच उज्ज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्याबाबत त्यांची भेट घेणार आहेत, अशी माहिती सुरेश धस यांनी दिली. तसेच यावेळी सुरेश धस यांनी संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेबाबत बोलताना आका हा सोपा आका नाही, ठराविक लोकांना प्रत्येक महिन्याला पैसे देत होता, असा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख पान ३ वर

## अपघातग्रस्त नौका मालकाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकसान भरपाई

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



मुंबईतील समुद्रात चीन देशाच्या माल वाहतूक जहाजाने धडक दिल्याने २८ डिसेंबर २०२४ रोजी मासेमारी नौकेचे नुकसान झाले होते. त्या मालवाहू जहाजाच्या कंपनीने नुकसान भरपाई देण्याचे मान्य केले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते १८ लक्ष ५५ हजार रूपयांचा धनादेश नुकसानग्रस्त नौकेच्या मालकाला प्रदान करण्यात आला.

मंत्रालयात मंत्री परिषद संपल्यानंतर नुकसानग्रस्त नौका मालकाला धनादेश देण्यात आला. या वेळी मत्स्यव्यवसाय विकास मंत्री नितेश राणे यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते.

२८ डिसेंबरला मुंबई समुद्रात हेमदीप टिपरी यांच्या मालकीच्या तिसाई या मासेमारी नौकेला मालवाहतूक जहाजाने धडक दिली होती. या धडकेत सुदैवाने जीवितहानी झाली नसली तरी मासेमारी नौकेचे मोठे नुकसान झाले होते. स्थानिक परवाना अधिकारी, सागरी पोलीस, बंदर निरीक्षक व मच्छीमार संस्थांचे प्रतिनिधी यांच्या समक्ष पंचनामा केला होता. त्यानुसार रुपये १८ लक्ष ५५ हजार रुपयांचे नुकसान झाले असल्याचे सांगितले.

बंदरे विकास व मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे यांच्या सूचनेनुसार संबंधित जहाज कंपनी व अपघातग्रस्त नौका मालक यांची बैठक बोलवण्यात आली होती. त्या बैठकीत कंपनीने नुकसान भरपाई देण्याचे मान्य केले होते. या नुकसान भरपाईचा धनादेश आज मुख्यमंत्री फ्फडणवीस

## चित्रपटसृष्टीतील कलाकार हल्लेखोर, खंडणीखोरांच्या निशाण्यावर?

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

अभिनेता सैफ्फअली खान याच्यावरील हल्ल्याने गेल्यावर्षी अभिनेता सलमान खान याच्या घराबाहेरील गोळीबाराचे प्रकरण पुन्हा स्मृतीपटलावर आणले. चित्रपटसृष्टीतील कलाकार, अभिनेते हे खंडणीखोरांच्या निशाण्यावर असल्याचे दिसते आहे. यापूर्वी अशा अनेक घटनांची नोंद झाली आहे.

सलमान खान - वांद्रे परिसरातील अभिनेता सलमान खानच्या गॅलेक्सी अपार्टमेंटबाहेर १४ एप्रिल,२०२४ ला करण्यात आलेल्या गोळीबार प्रकणात लॉरेन्स आणि अनमोल बिश्नोईविरोधात गुन्हा दाखल आहे. अनमोल बिश्नोईने सलमान खानच्या घराबाहेर गोळीबारा केल्याच्या घटनेची जबाबदारी स्वीकारली होती. त्यानंतर त्याच्याविरुद्ध लुकआउट नोटीस जारी करण्यात आली होती.याशिवाय अनमोल माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्येतील आरोपींच्या संपर्कात होता.

**सुनील पाल** - डिसेंबर २०२४ मध्ये, अभिनेता- हास्य कलाकार सुनील पाल यांचेही अपहरण झाले. अपहरणकर्त्यांनी त्यांच्याकडून २० लाख रुपयांची खंडणी मागितली आणि८ लाख रुपये मिळाल्यानंतर त्यांना मेरठमधील रस्त्यावर सोडून दिले. अपहरणकर्त्यांच्या टोळीतील नऊ सदस्यांनाही अटक करण्यात आले आहे.

**मुश्ताक खान** - नोव्हेंबर २०२४ अभिनेता मुश्ताक खान यांचे कथितपणे अपहरण झाले, त्यांना मेरठमध्ये एका कार्यक्रमाच्या बहाण्याने बोलावण्यात आले होते. अपहरणकर्त्यांनी त्यांना बिजनोरमधील चहशेरी भागात ठेवले आणि त्याचवेळी त्यांच्या मोबाईलवरून २ लाख रुपये हस्तांतरित केले. एक दिवसानंतर खान सुटून मुंबईत परतले.

**शाहरुख खान** -

सुपरस्टार शाहरुख खान यांना मुंबई अंडरवर्ल्डकडून अनेक वेळा धमक्या आल्या आहेत आणि कुख्यात अबु सालेमकडूनही त्याला धमकावण्यात आले होते. सध्या शाहरुखला वायप्लस सुरक्षा आहे.

**प्रीती झिंटा** -

अभिनेत्री प्रीती झिंटा यांनाही चोरी चोरी चुपके चुपके चित्रपटावेळी खंडणीसाठी धमकावण्यात आल्याचे सांगितले होते. धमकी देणाऱ्यांनी प्रीतीकडे ५० लाख रुपयांची मागणी केली होती. पान ३ वर

# ट्रम्पशाहीमध्ये पर्यावरणाला धोका


डोनाल्ड ट्रम्प यांनी पहिल्या कार्यकाळात २०१५ च्या पॅरिस हवामान करारातून अमेरिकेला वेगळे केले होते आणि या वेळीही त्यांनी तसे करण्याचे आश्वासन दिले आहे. निवडणूक प्रचारादरम्यान ट्रम्प यांनी तेलाच्या वापरासंदर्भातील नियोजनावर भर दिला. आपल्या पहिल्या कार्यकाळात पर्यावरणासाठी सर्वोत्तम काम केले गेले होते, असा दावा त्यांनी केला होता. त्या काळात हवा आणि पाणी सर्वात स्वच्छ होते, हा त्यांचा दावा इतिहासातील एका जुन्या काळाची आठवण करून देणारा आहे. हवामान बदलाच्या वास्तवाबाबत ट्रम्प यांच्या शंका सर्वांना माहीत आहेत. ट्रम्प हे उघडपणे 'सोशल मीडिया'वर आपले मत मांडत असतात. आपल्या भूमिकेबाबत ते वापरत असलेल्या भाषेत नक्कीच बदल झाला आहे; मात्र त्यांच्या विचारात कोणताही बदल झालेला नाही. एका रॅलीदरम्यान ट्रम्प यांना महागाईला कसे सामोरे जाणार, असे विचारण्यात आले होते. तेव्हा त्यांनी उत्तर दिले की ऊर्जेच्या किमती खाली येताच इतर वस्तूंच्या किमती आपोआप घसरायला लागतील. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये ट्रम्प यांनी दावा केला होता, की हवामान बदलाचा अमेरिकेवर होणारा परिणाम अतिशयोक्तीपूर्ण आहे आणि ही आमची समस्या नाही. त्यांनी त्वरित जीवाश्म इंधनाकडे परत येण्याचे आश्वासन दिले आहे. दुसऱ्या एका मुलाखतीत ट्रम्प म्हणाले होते की आधी अशी समस्या कधीच आली नव्हती. हा सर्व ज्यो बायडेन यांच्या ऊर्जाविषयक धोरणाचा परिणाम आहे. वाढत्या इंधन खर्चाच्या आव्हानाला तोंड देण्यासाठी ट्रम्प पुन्हा एकदा तेलाच्या नियोजनाला महत्त्व देण्याविषयी बोलत आहेत आणि जीवाश्म इंधनाच्या जास्तीत जास्त वापरावर भर देत आहेत. ट्रम्प यांचे नवनियुक्त ऊर्जामंत्री ख्रिस राईट यांनी या उपायाबाबत चित्र अगदी स्पष्ट केले. ते म्हणाले, ते 'खूप महाग' हरित ऊर्जेपासून दूर जातील आणि जुन्या उच्च-उत्सर्जन ऊर्जा संसाधनांना प्रोत्साहन देतील. राइट हे डेमोक्रॅटिक पक्षाच्या कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या अलीकडील धोरणांचे कट्टर टीकाकार आहेत. राईट हे पहिले पाऊल उचलत नैसर्गिक वायू निर्यात परवानग्यांवरील बंदी उठवू शकतात. बायडेन यांच्या प्रशासनाने वर्षभरापूर्वी ही बंदी लागू केली होती. राइट यांनीही यापूर्वी हवामानसंकट नाकारले आहे. खर्च कमी करण्यासाठी पर्यावरणविषयक नियम रद्द करण्यावर त्यांनी भर दिला होता. वाढता खर्च, महागाई आणि गरिबीवर एकमेव उपाय म्हणजे जीवाश्म इंधन जाळणे, असा दावाही त्यांनी केला होता. महागाई कमी करण्याचा कायदा (आयआरए) किंवा 'ग्रीन न्यू स्कॅम'चा अंत करण्याची भाषा ट्रम्प यांनी केली आहे. बायडेन प्रशासनाने २०२२ मध्ये लागू केलेल्या कायद्याचा महागाई कमी करण्याशी काहीही संबंध नाही. हा एक महत्त्वाचा कायदा आहे, जो हवामान धोरण, उत्पादन आणि व्यापाराशी अधिक संबंधित आहे. या कायद्यात इलेक्ट्रिक वाहने, विंड टर्बाइन आणि सौर पॅनेलसारख्या स्वच्छ इंधन संसाधनांमध्ये १.२ ट्रिलियन गुंतवणूक पॅकेजचा प्रस्ताव आहे. या कायद्याकडे अध्यक्ष म्हणून बायडेन यांचे सर्वात मोठे यश मानले जात आहे. यामुळे अमेरिकेला कार्बन उत्सर्जनाचे लक्ष्य पूर्ण करण्यात मदत झाली आहे. स्वच्छ ऊर्जेसाठी अधिक लवचिक पुरवठा साखळी तयार करण्यास मदत झाली आहे. ट्रम्प यांनी 'आयआरए'ला 'नवीन ग्रीन स्कॅम' म्हटले असून तो संपवण्याचे आश्वासन दिले आहे. हा कायदा रद्द केल्याने अमेरिकेचे अब्जावधी डॉलर्सचे नुकसान होऊ शकते आणि त्यासाठी अमेरिकन संसदेची मंजुरीही आवश्यक असेल.
या कामात ट्रम्प यांना आपले सहकारी असलेल्या रिपब्लिकन पक्षाच्या खासदारांच्या विरोधालाही सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. कारण या कायद्यानुसार उत्पादन क्षेत्रातील ८० टक्के गुंतवणूक रिपब्लिकन पक्षाचे वर्चस्व असलेल्या भागात यापूर्वीच झाली आहे. उदाहरणार्थ, जॉर्जियामध्ये सौर पॅनेल आणि इलेक्ट्रिक वाहनांचे भाग बनवणाऱ्या दक्षिण कॅरोलिनामध्ये बॅटरीच्या कारखान्यांना या कायद्यांतर्गत मोठ्या प्रमाणात पैसा मिळाला आहे. हजारो लोकांना रोजगार मिळाला आहे. इलॉन मस्क यांची टेस्ला ही कंपनी तसेच ट्रम्प यांच्या अनेक सहयोग्यांनाही या कायद्यांतर्गत देण्यात आलेल्या कर सवलतींचा फायदा झाला आहे. ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली पॅरिस हवामान करारास मान्यता देण्यास अमेरिकेने मनमानी पध्दतीने नकार दिला आहे. पॅरिस हवामान करारांतर्गत, सर्व सहभागी देशांना पुढील वर्षाच्या सुरुवातीला आपल्या राष्ट्रीय निर्धारित योगदानाची (एनडीसी) रूपरेषा सादर करायची आहे आणि वर्षाच्या अखेरीस त्यावर अंतिम निर्णय घ्यायचा आहे. गेल्या वर्षीच्या मध्यापासून 'ग्लोबल वॉर्मिंग'ने नवीन टप्प्यात प्रवेश केला आहे. २०२३ आणि २०२४ ही आजपर्यंतची सर्वात उष्ण वर्षे ठरली आहेत आणि चालू वर्षासाठीही हीच भीती व्यक्त केली जात आहे.
या पार्श्वभूमीवर अमेरिका हवामान संकट रोखण्याची दिशा ठरवेल, अशी अपेक्षा होती; परंतु ट्रम्प यांनी अमेरिकेची सूत्रे हाती घेतल्याने अमेरिकेबाबत जागतिक हवामान प्रयत्नांबाबत पुन्हा एकदा संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. हवामान बदलाच्या चर्चेचा केवळ जागतिक राजकारणावरच परिणाम होत आहे असे नाही.

# 'महाराष्ट्र फिल्म कंपनी' स्थापनकर्ते - बाबुराव पेंटर

**(१६ जानेवारी: बाबुराव पेंटर पुण्यस्मरण दिन सप्ताह.)**

बाबूराव आपल्या चित्रपटांतून मराठ्यांच्या तेजस्वी इतिहासाचे चित्रण आपले कलाकौशल्य पणाला लावून करीत. सैरंध्री चित्रपटापासूनच बाबूरावांनी चित्रपटाच्या कथानकाची माहिती देणाऱ्या इंग्रजी, मराठी, हिंदी व गुजराती या भाषांतील सचित्र पुस्तिका प्रकाशित करण्याचा उपक्रम सुरू केला होता. त्यांनी तयार केलेली चित्रपटांची भित्तिपत्रके आणि जाहिरातींचे फलक - पोस्टर व बॅनर यांमध्ये कलात्मकता असे. त्यांच्या एका मूकचित्रपटाच्या जलरंगातील जाहिरातींच्या दृश्यमांडणीचा जे.जे.स्कूल ऑफ़ आर्टचे तत्कालीन प्राचार्य सॉलोमन यांनी गौरव केला होता. त्यांच्या कलेचे स्मरण श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी येथे करत आहेत... संपादक

बाबूराव पेंटर हे प्रसिद्ध महाराष्ट्रीय चित्रकार, शिल्पकार आणि चित्रपट-निर्माते व दिग्दर्शक होते. त्यांचे पूर्णनाव बाबूराव कृष्णाजी मेस्त्री-मिस्त्री असे होते. त्यांचा जन्म दि.३ जून १८९० रोजी कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील सुतारकाम, लोहारकाम करीत. बाबूरावांचा लौकिक चित्रकार म्हणून असला, तरी त्यांना खरीखुरी कीर्ती लाभली ती त्यांनी केलेल्या चित्रपटक्षेत्रातील कामगिरीमुळे. आपले आतेभाऊ आनंदराव मेस्त्री यांच्या मदतीने त्यांनी 'डेक्कन सिनेमा' सुरू केला होता, पण तो लवकरच बंद पडला, त्यानंतर १९१३ मध्ये त्या दोघांनी बाबूराव रूईकर यांच्यासह 'महाराष्ट्र सिनेमा' ह्या चित्रपट निर्मितिसंस्थेची निर्मिती केली; ती बंद करून पुढे १ डिसेंबर १९१७ रोजी आपल्या बंधूंच्या स्मरणार्थ बाबूरावांनी 'महाराष्ट्र फ़िल्म कंपनी' ची स्थापना केली आणि १९१९ मध्ये सैरंध्री या आपल्या कलात्मक मूकपटाची निर्मिती केली. कल्पकता, भव्यता, स्त्रियांनीच केलेल्या स्त्री भूमिका आणि पौराणिक काळातील राजवैभवाचे दर्शन हे या चित्रपटाचे वैशिष्ट्य होते. ७ फ़ेब्रुवारी १९२० रोजी पुण्याच्या आर्यन सिनेमागृहात सैरंध्री प्रदर्शित झाला व लो. टिळकांनी हा चित्रपट पहिला दि.८ फ़ेब्रुवारी १९२० रोजी. त्यांनी बाबूरांवाना 'सिनेमा केसरी' या उपाधीने गौरविले. महाराष्ट्र फ़िल्म कंपनीद्वारा बाबूरावांनी १९२०-३० या दशकात एकूण १७ चित्रपटांची निर्मिती केली. त्यांपैकी वत्सलाहरण-१९२१ व भक्त प्रल्हाद-१९२६ हे पौराणिक, तर सिंहगड-१९२३, कल्याण खजिना-१९२४, सती पद्मिनी-१९२४ व शहाला शह-१९२५ हे ऐतिहासिक आणि सावकारी पाश-१९२५ हा सामाजिक कथानकावरील वास्तववादी चित्रपट होय. सिंहगड हा त्यांचा चित्रपट अनेक दृष्टींनी महत्त्वपूर्ण ठरला. त्यातील रात्रीच्या लढाईचे चित्रिकरण त्याकाळी त्यांनी प्रज्योत दिव्याच्या- आर्क लॅंप प्रकाशझोतात केले. विजेच्या प्रकाशात चित्रिकरण केलेला हा पहिला भारतीय चित्रपट होय. पन्हाळा किल्ल्याच्या परिसरात केलेल्या चित्रिकरणामुळे तो बाह्यचित्रिकरणाच्या दृष्टीनेही पहिलाच चित्रपट ठरतो. याच चित्रपटाच्या वेळी मुंबईला प्रेक्षकांची अलोट गर्दी लोटल्यामुळे तिचे नियंत्रण सरकारला करावे लागले. तेव्हापासून सरकारचे लक्ष चित्रपटाकडे वेधले गेले व या चित्रपटापासूनच करमणूक कर बसविण्यात आला. या चित्रपटाच्या जाहिरातीसाठी बाबूरावांनी शिलामुद्रण केलेली ३.४८ ६.९६ मीटर- १० २० फ़ूट लांबी-रुंदीची भित्तिपत्रके तयार केली होती. ती चांगलीच प्रभावी ठरली. त्या दृष्टीनेही चित्रपटांच्या भित्तिपत्रकांचे जनकत्व बाबूरावांकडे जाते. त्यांच्या सैरंध्री या चित्रपटातील कीचकवधाचे दृश्य परिणामकारक होते, ते पाहून काही प्रेक्षक मूर्च्छित पडले. तेव्हापासून सरकारने चित्रपटांच्या अभ्यवेक्षणास सुरुवात केली. कल्याण खजिना, सती पद्मिनी व सिंहगड या त्यांच्या मूकपटांना यूरोपमधील वेम्बले येथील चित्रपटप्रदर्शनात सुवर्णपदके लाभली.



वत्सलाहरणाच्या निर्मितीनंतर त्यांनी मार्कंडेयाचे चित्रीकरण सुरू केले, परंतु ६ नोव्हेंबर १९२२ रोजी चित्रीकरणाच्या वेळी चित्रपट निर्मितिगृहाला एकाएकी आग लागली. तथापि त्या संकटातूनही त्यांनी आपला चित्रपटसंसार उभा केला व चित्रपटनिर्मिती सुरू ठेवली. त्याकाळी महाराष्ट्र फ़िल्म कंपनी ही एक अग्रगण्य चित्रपटसंस्था मानली जाई. चित्रपटातील कथानकाच्या दृष्टीने कालोचित ठरणारी वेशभूषा व वातावरणनिर्मिती करण्याची बाबूरावांची हातोटी होती. त्यांचा मुख्य भर बाह्य नेपथ्यापेक्षा अभिनयावर अधिक असे.

बाबूराव आपल्या चित्रपटांतून मराठ्यांच्या तेजस्वी इतिहासाचे चित्रण आपले कलाकौशल्य पणाला लावून करीत. सैरंध्री चित्रपटापासूनच बाबूरावांनी चित्रपटाच्या कथानकाची माहिती देणाऱ्या इंग्रजी, मराठी, हिंदी व गुजराती या भाषांतील सचित्र पुस्तिका प्रकाशित करण्याचा उपक्रम सुरू केला होता. त्यांनी तयार केलेली चित्रपटांची भित्तिपत्रके आणि जाहिरातींचे फ़लक - पोस्टर व बॅनर यांमध्ये कलात्मकता असे. त्यांच्या एका मूकचित्रपटाच्या जलरंगातील जाहिरातींच्या दृश्यमांडणीचा जे.जे.स्कूल ऑफ़ आर्टचे तत्कालीन प्राचार्य सॉलोमन यांनी गौरव केला होता.

बाबूरावांना चित्रपटापेक्षा चित्रकलेत अधिक स्वारस्य होते, तसेच त्यांच्या चित्रपटनिर्मितीत व्यावसायिक दृष्टी फ़ारशी नसल्यामुळे त्यांचे सहकाऱ्यांशी मतभेद झाले व त्यांपैकी काहीजण कंपनीतून बाहेर पडले. पुढे बाबूरावांनी लंका-१९३० या चित्रपटानंतर आणखी तीन चित्रपटांची निर्मिती केली. त्यानंतर मात्र महाराष्ट्र फ़िल्म कंपनी कायमचीच बंद झाली. बोलपटाचे युग सुरू झाल्यावर कोल्हापूरच्या ''शालिनी सिनेटोन'' या संस्थेला बाबूरावांनी सहकार्य दिले व तिच्याद्वारे निर्माण झालेला उषा, सावकारी पाश-१९३५ व प्रतिमा तसेच साध्वी मीराबाई-१९३७, रुक्मिणी स्वयंवर-१९४६, लोकशाहीर रामजोशी-१९४७ व विश्वामित्र-१९५२ या बोलपटांचेही त्यांनी दिग्दर्शन केले.



– संकलन व शब्दांकन –
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

भारतीय चित्रपटसृष्टीचा पाया दादासाहेब फाळके यांनी घातला आणि बाबूरावांनी त्याला कलात्मक शिस्त व सौंदर्य प्राप्त करून देवून पुढचे पाउल टाकले. त्यांच्याच तालमीत तयार झालेले व्ही.शांताराम, एसब.फ़त्तेलाल, विष्णुपंत दामले व केशवराव धायबर यांनी तो वारसा पुढे चालविला.

बाबूरांवांच्या चित्रकलेवर वॅट्स, रॉझेटी, बर्न्स व लॅंडशियर इ.चित्रकारांची छाप दिसून येते. त्रिदाद, आगासकर, नागेशकर, पत्रावळे व हळदणकर या नावाजलेल्या भारतीय चित्रकारांनी हाताळलेली तंत्रे ते अभ्यासत व आत्मसात करण्याचा प्रयत्न करीत. कलामहर्षी म्हणून ते गौरविले जात. प्रतिमाचित्रणातील कौशल्य व रंगभूमीवरील नेपथ्य, विशेषत: पडद्याची कलात्मकता या बाबतींत त्यांनी खूपच लौकिक मिळविला होता. चित्रशिल्पादी कलाक्षेत्रांत त्यांनी स्वाध्यायाच्या बळावरच आपली प्रगती करून घेतली.

शिल्पकलेत मृद्-शिल्पनापासून तर ब्रॉंझच्या ओतकामापर्यंतची सर्व कामे ते स्वत:च करीत. नंतर त्यांनी त्यासाठी स्वत:ची ओतशाळाही उभारली होती. त्यांनी महात्मा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फ़ुले इत्यादींच्या केलेल्या शिल्पाकृती खूप नावाजल्या. त्यांचे दि.१६ जानेवारी १९५४ रोजी कोल्हापूर येथे दुःखद निधन झाले. कलामहर्षी बाबुरावजी पेंटर यांना पुण्यस्मरण दिनानिमित्त लेखरुपाने विनम्र अभिवादन.

# इंडिया आघाडीची एक्स्पायरी डेट...




**केंद्रातील** सत्तेपासून भाजपाला रोखण्यासाठी लोकसभा निवडणुकीच्या अगोदर स्थापन झालेल्या इंडिया नामक आघाडीची एक्स्पायरी डेट आता जवळ आली असून आघाडीतील प्रमुख पक्षच विसर्जनाची भाषा बोलू लागले आहेत. लोकसभा निवडणुकीत अब की बार ४०० पार अशी घोषणा देणाऱ्या भाजपाला इंडिया आघाडीने २४० जागांवर रोखले. पण नववर्षात इंडिया आघाडीला आपला गाशा गुंडाळण्याची वेळ आली. लोकसभा निवडणुकीत मिळालेले यश विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला टिकवता आले नाही. विशेषत: सत्तेवर येण्याची स्वप्ने पाहणाऱ्या भाजपा विरोधी आघाडीची महाराष्ट्र व हरियाणा या दोन राज्यांत मोठी दुर्दशा झाली. इंडिया आघाडीतील सर्वात मोठा पक्ष असलेल्या काँग्रेसवर आणि काँग्रेसचे नेतृत्व करणाऱ्या राहुल गांधी, प्रियंका गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांच्यावर आघाडीतील प्रादेशिक पक्षांचा विश्वास राहिलेला नाही आणि काँग्रेस पक्षही आघाडीतील घटक पक्षांना ढुंकून विचारत नाही. दिवसेंदिवस बलाढ्य होत असलेल्या भारतीय जनता पक्षाला काँग्रेस स्वबळावर तोंड देऊ शकत नाही आणि भाजपाशी लढण्यासाठी काँग्रेस इंडिया आघाडीतील घटक पक्षांशी चर्चाही करीत नाही.

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने इंडिया आघाडीतील व राज्यात महाविकास आघाडीतील मतभेद उफ़ाळून आले आहेत. राष्ट्रीय पातळीवर काँग्रेस हाच भाजपाचा राजकीय शत्रू नंबर १ आहे आणि दुसरीकडे इंडिया आघाडीतील घटक पक्ष काँग्रेसची झूल नि राहुल गांधींचे नेतृत्व झुगारून देण्याची भाषा बोलत आहेत. इंडिया आघाडीतील असंतोषाचा लाभ भाजपाला मिळतो आहे. म्हणूनच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा भाजपाला शतप्रतिशत यश मिळवून देण्याचा एल्गार पुकारत आहेत. इंडिया आघाडीची अवस्था आयसीयूमध्ये गेल्यासारखी आहे. ही वेळ आघाडीवर आणली कोणी? लोकसभा निवडणूक निकालानंतर भाजपाला पुन्हा मोठे यश मिळू लागले आहे, त्यामुळे इंडियाचे नेते हबकले आहेत. इंडिया आघाडीवर विसर्जनाची पाळी राहुल गांधी यांच्या वागण्यामुळे आली आहे का, या प्रश्नाने काँग्रेसलाही निरूत्तर केले आहे. राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांनी म्हटले की, इंडिया आघाडीचा हेतू लोकसभा निवडणुकीत भाजपाला पराभव करणे इतकाच मर्यादित होता. जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी म्हटले की, भाजपा विरोधकांमध्ये एकजूट नाही. म्हणून इंडिया आघाडी बरखास्त केली पाहिजे. महाराष्ट्रातील उबाठा सेनेने तर, इंडिया आघाडीची गरज संपली असेल तर काँग्रेसने तसे जाहीर करावे, कोणत्या मार्गाने जायचे ते आम्ही ठरवू. इंडिया आघाडीची निर्मिती कशासाठी झाली होती? पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली देशभर भाजपाचा अश्वमेध चौफ़ेर दौडत आहे, त्यामुळे अनेक राजकीय पक्षांचे अस्तित्वच धोक्यात आले. भाजपा विरोधी मतांचे विभाजन होऊ नये म्हणून इंडिया या बॅनरखाली पक्षांना एकत्र आणून भाजपाला रोखायची रणनिती आखण्यात आली. दि. १८ जुलै २०२३ रोजी बंगळूरु येथे काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, सपा, आम आदमी पक्ष आदी २६ राजकीय पक्ष एकत्र आले व त्यांनी आघाडी स्थापन केली. इंडियन नॅशनल डेव्हलपमेंट इन्क्लुसिव्ह अलायन्स म्हणजेच इंडिया असे आघाडीचे नामकरण करण्यात आले. काँग्रेसचे मल्लिकार्जुन खरगे यांना आघाडीचे अध्यक्ष करण्यात आले. सन २०२४च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला सत्तेतून हटवावयाचे हाच इंडिया आघाडीचा उद्देश होता. बंगळूरुच्या बैठकीत ममता बॅनर्जी यांनी आघाडीचे सारे कार्यक्रम, प्रचार मोहीम, प्रसिद्धी सर्व काही इंडिया या बॅनरखाली असेल असे जाहीर केले. पण आघाडी स्थापन झाल्यावर प्रादेशिक पक्षांकडून काही हादरे बसले, तर काही वेळा अपशकूनही झाले. इंडियाच्या स्थापनेनंतर सहा महिन्यांतच म्हणजे २४ जानेवारी २०२४ रोजी ममता बॅनर्जी यांनी पश्चिम बंगालमध्ये लोकसभा निवडणूक आपला पक्ष स्वबळावर लढणार असल्याचे जाहीर केले. पश्चिम बंगालमध्ये काँग्रेस दुर्बल आहे. काँग्रेसने तृणमूल काँग्रेसकडे १०-१२ जागांची मागणी केली होती, पण ममता यांनी त्याला साफ़ नकार दिला. ममता बॅनर्जी इंडिया आघाडीतून बाहेर पडल्या नाहीत किंवा इंडियाशी त्यांनी कधी फ़ारकत घेतली नाही. पश्चिम बंगालमध्ये मेरी मर्जी अशी त्यांची भूमिका कायमच ताठर राहिली आहे. ममता यांच्या स्वबळावरच्या घोषणेच्या पाठोपाठ बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी तर

दि. २७ जानेवारी २०२४ रोजी इंडियाला राम राम केल्याची बातमी झळकली. एवढेच नव्हे तर त्यांनी थेट भाजपाप्रणीत एनडीएचा रस्ता धरला. ज्या नेत्याने इंडियाचा पाया रचला तोच भगव्या ब्रिगेडमध्ये निघून गेला. ममता व नितीश कुमार यांचे मेरी मर्जी राजकारण भाजपाच्या पथ्यावरच पडले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दि. १२ मे २०२४ रोजी बिहारमध्ये पाटण्यात केलेल्या रोड शोमध्ये बोलताना काँग्रेसला झोडून काढले. ते म्हणाले, केवळ एका परिवाराचे हित जपण्यासाठी व काहीही करून सत्ता काबीज करण्यासाठी विरोधी पक्षांची धडपड चालू आहे पण आम्ही ते साध्य होऊ देणार नाही. भाजपाने २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत २८२ जागा जिंकल्या. सन २०१९च्या निवडणुकीत भाजपाचे ३०३ खासदार निवडून आले. २०२४ च्या निवडणुकीत भाजपाने ४०० पारची घोषणा दिली होती. पण २०२४ च्या निवडणुकीत काँग्रेसची घोडदौड २४० वर थांबली, तर काँग्रेसच्या खासदारांच्या संख्येने शंभरी गाठली. काँग्रेसच्या यशात इंडिया आघाडीचा वाटा मोठा होता. सन २०१९ मध्ये लोकसभेतील एनडीएच्या खासदारांची संख्या ३६० होती, २०२४ मध्ये ती २९३ झाली. सन २०१९ मध्ये भाजपाच्या खासदारांची संख्या ३०३ होती, तर २०२४ मध्ये २४० वर थांबली. सन २०१९ मध्ये विरोधी आघाडीच्या खासदारांची संख्या ११९ होती, २०२४ मध्ये २३४ पोहोचली. २०१९ मध्ये काँग्रेसचे लोकसभेत ५२ खासदार होते, २०२४ मध्ये ही संख्या १०० झाली. लोकसभेत २०१४ व २०१९ मध्ये विरोधी पक्ष दुर्बल होता. विरोधी पक्ष नेताही नव्हता. २०२४ मध्ये विरोधी पक्ष मजबूत झाला. राहुल गांधी हे विरोधी पक्ष नेता आहेत. २०२४ च्या निवडणुकीत भाजपाने ५४३ पैकी ४४१ जागांवर स्वत:चे उमेदवार उभे केले होते. इंडिया आघाडीने ४६६ जागांवर भाजपाशी लढत दिली. आरक्षण, संविधान, महागाई व बेरोजगारी या मुद्द्यावर इंडिया आघाडीने प्रचारात भर दिला. भाजपाला संविधान बदलायचे आहे, म्हणून ४०० पारची घोषणा दिली आहे, असा प्रचार आघाडीने केला व त्याचा अपेक्षित परिणाम मतदानावर झाला. ऑक्टोबर २०२४ मध्ये हरियाणात विधानसभा निवडणूक झाली. या राज्यात आप आणि सपा दोन्ही पक्षांना निवडणूक लढवायची होती. पण काँग्रेसने त्यांना जागा सोडण्यास नकार दिला. काँग्रेसमधील गटबाजी व इंडियामध्ये फ़ाटाफ़ूट याने काँग्रेसची हरियाणात वाट लागली व भाजपाने पुन्हा सत्ता काबीज केली. महाराष्ट्रात महाआघाडीत सत्ता वाटपात शेवटपर्यंत घोळ चालू राहिला. लोकसभेत यश मिळाले म्हणून आघाडीला फ़ाजिल आत्मविश्वास नडला.


काँग्रेस व उबाठा सेना अगोदरपासूनच मुख्यमंत्रीपदाच्या मुंडावळ्या घेऊन तयार होते. गाफ़ील आघाडीवर भाजपाने मात केलीच पण लाडकी बहीण योजना व ओबीसींनी भाजपा-महायुतीला महाप्रचंड बहुमत दिले. महाआघाडीचे ५० आमदारही निवडून आणता आले नाहीत मग इंडिया हवीच कशाला, अशी खदखद सुरू झाली. लोकसभेत अखिलेश यादव हे अगोदर पुढील रांगेत बसायचे, पण संसदेच्या हिवाळी अधिवेशनात त्यांना मागे ३५५ क्रमांकाचे आसन मिळाले. अखिलेश यांनी धन्यवाद अशी प्रतिक्रिया देऊन नाराजी व्यक्त केली. हरियाणा व महाराष्ट्रातील पराभवानंतर ममता बॅनर्जी यांनी इंडियाची निर्मिती आपण केली, पण आघाडीचे नेतृत्व बरोबर नाही, मला संधी मिळावी अशी टीप्पणी केली. लोकसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्र, हरियाणा, जम्मू-काश्मीर आणि झारखंड या चारही राज्यांत काँग्रेसचा जबर पराभव झाला. दिल्लीत काँग्रेस व आप एकमेकांच्या विरोधातच लढत आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर काँग्रेसला जनतेचा विश्वास मिळवता आला नाही आणि इंडियातील मित्रपक्षांचाही काँग्रेसवर विश्वास राहिलेला नाही. सन २०२५ मध्ये दिल्ली आणि बिहार, सन २०२६ मध्ये आसाम, पश्चिम बंगाल, तामिळनाडू व केरळ, सन २०२७ मध्ये उत्तर प्रदेशमध्ये विधानसभा निवडणूक आहे. गेल्या सात महिन्यांत इंडिया आघाडीची बैठकच झाली नाही. कोणाची कोणाला गरज वाटत नाही. इंडिया आघाडीची एक्स्पायरी डेट जवळ आली आहे.

**– डॉ. सुकृत खांडेकर**

# जनाब, जावेदजी अख्तर

**(१७ व १८ जानेवारी: जावेद अख्तर जन्मदिन-वाढदिवस विशेष.)**

**जावेद अख्तर हे भारतीय हिंदी चित्रपटसृष्टीतील नामवंत कथा-पटकथाकार, गीतकार आणि कवी आहेत. हिंदी चित्रपटसृष्टीत सत्तरऐंशीच्या दशकात जावेद अख्तर यांनी सलीम खान यांच्यासोबत लिहिलेल्या यशस्वी कथा-पटकथांमुळे सलीम-जावेद ही जोडी जनमानसात प्रसिद्ध झाली. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर माहितीपूर्ण लेख.... संपादक**



जावेद अख्तर यांचा जन्म दिनांक १७ जानेवारी १९४५ रोजी ग्वाल्हेर येथे झाला. त्यांचे वडील जान निसार खान हेदेखील हिंदी चित्रपटसृष्टीत गीतकार आणि कवी होते. जावेद यांचे शालेय शिक्षण लखनौ येथे आणि महाविद्यालयीन शिक्षण भोपाळमधील सोफिया कॉलेजमध्ये झाले. जावेद अख्तर यांनी सुरुवातीच्या काळात कैफ्फी आझमी यांचे साहाय्यक म्हणून काम पाहिले. तसेच याकाळात एका चित्रपटाकरिता संवादही लिहिले; पण त्यात त्यांनाफारसे यश मिळाले नाही. सरहदी लुटेरा या चित्रपटाच्या कामावेळी त्यांची सलीम खान यांच्याशी भेट झाली. सलीम-जावेद या जोडीने अधिकार-१९७१ आणि अंदाज या चित्रपटासाठी प्रथमतः एकत्र कथा-पटकथा संवाद लिहिले. सलीम खान हे कथा लिहीत असत आणि जावेद अख्तर त्यांना संवादलेखनात मदत करीत असत. अंदाज आणि अधिकार या चित्रपटानंतर सलीम-जावेद यांनी सीता और गीता-१९७२, यादों की बारात-१९७३, जंजीर-१९७३, हाथ की सफ्फाई-१९७४, दीवार-१९७५, शोले-१९७५, चाचा भतिजा-१९७७, डॉन-१९७८, त्रिशूळ-१९७८, दोस्ताना-१९८०, क्रांती-१९८१, जमाना-१९८५, मिस्टर इंडिया-१९८७ या आणि अशा एकूण २२ हिंदी आणि दोन कन्नड चित्रपटांच्या कथा-पटकथा आणि संवाद लिहिले. त्यांनी लिहिलेल्या चोवीस चित्रपटांपैकी आखरी दाँव, इमान धरम, काला पत्थर आणि शान हे चार चित्रपट सोडल्यास बाकीच्या चित्रपटांनी तिकीटबारीवर उत्तम यश संपादन केले.

जावेद अख्तर आणि सलीम खान या जोडीमुळे 'सिने पटकथाकार' या भूमिकेला एक विशिष्ट दर्जा प्राप्त झाला. चित्रपटाच्या जाहिरात पृष्ठावर कथा-पटकथालेखक तसेच संवादलेखक यांचे नाव यायलाच हवे असा त्यांचा आग्रह असे. सन १९८२नंतर मात्र सलीम-जावेद जोडीत बेबनाव होऊन ते वेगवेगळे झाले. यानंतर जावेद अख्तर कथा-पटकथालेखक आणि त्याचबरोबर गीतकार म्हणूनही स्वतंत्रपणे उदयास आले. त्यांनी स्वतंत्रपणे लिहिलेल्या चित्रपटांत बेताब-१९८३, मशाल-१९८४, सागर-१९८५, अर्जुन-१९८५, मेरी जंग-१९८५, डकैत-१९८७,= लक्ष्य-२००४ आणि डॉन-द चेस बिगिन्स अगेन-२००६ हे चित्रपट उल्लेखनीय समजले जातात. त्यांनी ८०हून अधिक चित्रपटांकरिता गाणी, कथा-पटकथा आणि संवाद लिहिले आहेत.

गीतकार म्हणून जावेद अख्तर यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. जनसामान्यांसाठी सहज, सोपी आणि उडत्या चालींची गाणी तर त्यांनी लिहिली आहेतच; पण त्याचबरोबर अत्यंत तरल आणि अर्थगर्भ गीतेही लिहिली आहेत. ''तुमको देखा तो ये खयाल आया'', ''संदेसे आते है'', ''एक लडकी को देखा तो ऐसा लगा'', ''पंछी, नदियाँ, पवन के झोंके'' या आणि अशा अनेक गीतांमधून त्यांनी मानवी मनातील भावभावनांचा कोलाज उभा केला आहे. साज (मेलडी-१९९७), बॉर्डर-१९९७), गॉडमदर-१९९९, रेफ्युजी-२००० आणि लगान-२००१ या चित्रपटांतील माणसाच्या जगण्याचा तळ शोधणाऱ्या गीतांसाठी जावेदजी यांना उत्कृष्ट गीतकार म्हणून पाच वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. तसेच तरकश आणि लावा हे त्यांचे कवितासंग्रह देखील रसिकांच्या पसंतीस उतरले आहेत. त्यातील लावा या कवितासंग्रहास उर्दू भाषेतील ''साहित्य अकादमी'' पुरस्कार प्राप्त झाला आहे.

जावेद अख्तर यांच्या पहिल्या पत्नीचे नाव हनी इराणी आहे. हनी इराणी याही पटकथा लेखाकार आहेत. या दोघांना फ्फरहान आणि झोया ही दोन मुले झाली. फ्फरहान अख्तर हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक, निर्माता व अभिनेता आहे. तर झोया अख्तर याही यशस्वी चित्रपटनिर्माती व दिग्दर्शक म्हणून कार्यरत आहेत. जावेद अख्तर यांनी हनी इराणींपासून विभक्त झाल्यावर हिंदी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेत्री शबाना आझमी यांच्याशी विवाह केला. जावेद यांनी फ्फरहान यांच्याबरोबर दिल चाहता है, लक्ष्य, रॉक ऑन आणि मुलगी झोया बरोबर 'जिंदगी ना मिलेगी दोबारा' या चित्रपटांवर काम केले आहे.

जावेदजी अख्तर यांना भारत सरकारने चित्रपटातील उत्कृष्ट कारकीर्दीसाठी १९९९ साली ''पद्मश्री'' आणि नंतर २००७ साली ''पद्मभूषण'' या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित केले आहे. तसेच जावेद अख्तर यांनी त्यांच्या कारकीर्दीत उत्कृष्ट गीत, संवाद आणि कथेसाठी अनेक फ्फिल्मफ्फेअर पुरस्कारही मिळवले आहेत. बुद्धिवादाला सदैव साक्षी ठेवणाऱ्या आणि पारंपरिक, श्रद्धाळू विचारसरणीला धिक्कारणाऱ्या जावेद अख्तर यांनी आपल्या जाहीर वक्तव्यांतून आणि साहित्यकृतींतून धर्मनिरपेक्षता आणि मानवी हक्क या लोकशाही मूल्यांचा निर्भिडपणे पुरस्कार केला आहे. सन २०२० साली ''रिचर्ड डॉकीन्स'' पुरस्काराने त्यांच्या या भूमिकेचा आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव करण्यात आला आहे. कलात्मकतेला जोपासत व्यावसायिकता सांभाळणाऱ्या आणि भारतीय समाजातील विविधतेवर प्रेम करणाऱ्या या मनस्वी कलावंताला भारतीय चित्रपटसृष्टीत मानाचे स्थान आहे.

अलीकडेच गीतकार जावेद अख्तर यांनी एका शोमध्ये गाणेट लिहिण्यास का होकार दिला? याचा खुलासा केला. ते म्हणाले, 'मी सहसा चित्रपटात फ्फक्त एकच गाणं लिहित नाही. राजू हिराणी सरांनी मला फ्फक्त एका गाण्याचे बोल लिहायला सांगितले. मी नकार दिला, पण ते आग्रहाने म्हणाले, 'हे गाणे आपल्या शिवाय कोणीही लिहू शकत नाही.' यानंतर मी त्याच्यापुढे काही अटी ठेवल्या आणि मग ते लिहिले. जावेद अख्तर पुढे म्हणाले, 'त्यांनी डोळे न बघता त्या अटी मान्य केल्या. हा माझा चमत्कार नाही, हा राजू हिराणीचा चमत्कार आहे, ज्यांच्या मागे ५ सुपर-डुपर हिट चित्रपट होते, त्यांना समजले की मला या माणसाकडून हे गाणे मिळेल. अहंकार त्यांच्यावर जबरदस्त नव्हता, उलट त्यांच्या चित्रपटावरील प्रेम त्यांच्यावर जबरदस्त होता. त्याला सलाम!'

!! आज जावेदजींचा वाढदिवस, त्यानिमित्त त्यांना आभाळ भरभरून हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

- संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सअॅप-९४२३७१४८८३.

पान १ वरून

## आका हा सोपा आका नाही, ठराविक लोकांना प्रत्येक महिन्याला पैसे देत होता

यांच्या हत्या प्रकरणासंदर्भात माध्यमांशी बोलताना सुरेश धस यांनी म्हटलं की, बीडच्या प्रकरणात सरकारी वकील म्हणून उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करायची असल्याची माहिती मला मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. मला वाटतं की ते दिल्लीला जाण्यापूर्वी किंवा आल्यानंतर ते उज्ज्वल निकम यांची भेट घेतील, असं सुरेश धस यांनी म्हटलं आहे.

**धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याबाबत धस काय म्हणाले?**

मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेणं आणि न घेणं हा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचा अंतर्गत प्रश्न आहे. त्यामुळे मी राष्ट्रवादीमधील अंतर्गत असलेल्या विषयांवर बोलणार नाही. मात्र, राष्ट्रवादी पक्षाचा कोणावर दबाव वाढला आहे का? की नाही? किंवा कोणावर दबाव नाहीच. याबाबत जो काही विचार करायचा तो पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी करावा. सुनील तटकरे, प्रफ्फुल पटेल, छगन भुजबळ यांनी धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याबाबत निर्णय घ्यावा. माझ्या सारख्या व्यक्तीने राष्ट्रवादीतील अंतर्गत गोष्टींवर काय बोलावं?, असं सुरेश धस यांनी म्हटलं.

**'जर एखादी त्रुटी राहिली तरः'**

संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात जर पोलिसांकडून एखादी जरी त्रुटी राहिली तर न्यायालयीन चौकशीत कोणतीही त्रुटी राहू शकत नाही. मग जे कोणी आका, बाका, चाचा, मामा हे या प्रकरणातील सर्व लोक आहेत, ज्यांनी-ज्यांनी संतोष देशमुख यांची हत्या केली त्या सर्वांची न्यायालयीन चौकशी होईल आणि आरोपींना फाशीची शिक्षा होईल अशी अपेक्षा आहे. जो आका आहे, तो आका सोपा आका नाही. आका १७-१७ मोबाईल वापरत होता. त्यामुळे आका काहीही करू शकतो. तसेच आका काही ठराविक लोकांना प्रत्येक महिन्याला पैसे पाठवत होता, असा गंभीर आरोप आमदार सुरेश धस यांनी केला आहे.

दरम्यान, वाल्मिक कराडची पत्नी मंजिली कराड यांनी आमदार सुरेश धस आणि खासदार बजरंग सोनवणे यांच्यावर माध्यमांशी बोलताना काही आरोप केले होते. तसेच वाल्मिक कराडवर मकोका चुकीच्या पद्धतीने लावण्यात आला असल्याचं त्यांनी म्हटलं होतं. दरम्यान, मंजिली कराड यांनी केलेल्या आरोपासंदर्भात आमदार सुरेश धस यांनी आपण काहीही बोलणार नसल्याचं म्हटलं आहे.

## चित्रपटसृष्टीतील कलाकार हल्लेखोर, खंडणीखोरांच्या निशाण्यावर?

निर्माता दिनेश आनंद व अजित दिवानी

१४ फेब्रुवारी २००१ ला निर्माता दिनेश आनंद व ३० जून २००१ ला अभिनेती मनिषा कोयरालाचा माजी सचिव व निर्माता अजित दिवाणी यांची छोटा अबु सालेमने हत्या घडवून आणली होती. छोटा शकीलसोबत वादातनंतर सालेमने या दोघांच्या हत्या केल्याचे बोलले जाते.

राकेश रोशन

२००० मध्ये कहो कहो नाः प्यार है या चित्रपटानंतर निर्माता व दिग्दर्शक राकेश रोशन यांना खंडणीसाठी अबु सालेमकडून धमक्या आल्या होत्यात त्यानंतर २१ जानेवारी २००० मध्ये दोन व्यक्तींनी त्यांच्यावर गोळीबार केला. त्यांच्या डाव्या हाताला गोळी लागली, आणि छातीला गोळी चाटून गेली. जखमी असतानाही राकेश रोशन स्वतः गाडी चालवून सांताक्रूझ पोलीस ठाण्यात पोहोचले आणि नंतर त्यांना नानावटी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

**निर्माता जावेद रियाज सिद्धीकी**

निर्माता जावेद रियाज सिद्दीकी यांची १९९४ मध्ये अंधेरी यारी रोड येथे गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती. हिंदी चित्रपट सृष्टीतील ही पहिली हत्या मानली जाते. त्यावेळी हिंदी चित्रपटसृष्टी हादरली होती.

**निर्माता मुकेश दुग्गल**

निर्माता सिद्धीकी यांच्याप्रमाणे दुग्गल यांचीही अबु सालेमने अंधेरी येथे हत्या घटवून आणली होती. सिद्दीकी यांच्या हत्येनंतर तीन वर्षांनी ८ मार्च १९९७ मध्ये ही हत्या झाली होती.

**गुलशन कुमार**

टी-सीरीजचे संस्थापक गुलशन कुमार यांच्या १९९७ मध्ये हत्या करण्यात आली होती. गुजशनकुमार कुमार मुंबईतील अंधेरीतील शिवमंदिरात दररोज सकाळ-संध्याकाळ प्रार्थनेसाठी जायचे. त्यावेळी १२ ऑगस्ट १९९७ ला त्यांना हेरून गोळीबार करण्यात आला होता. त्यानंतर कूपर रुग्णालयात त्यांना मृत घोषित करण्यात आले होते. त्यापूर्वी त्यांना दोनवेळी त्यांना धमकीचे दूरध्वनी आले होते.

निर्माता राजीव राय

निर्माता राजीव राय यांच्यावर हल्ला व अपहरणाचा प्रयत्न १९९७ मध्ये झाला होता. अबु सालेमने यापूर्वी त्यांना धमकी दिली होती. त्यानंतर त्यांना पोलीस सुरक्षा पुरवण्यात आली होती. पोलीस सुरक्षा रक्षकामुळे हा प्रयत्न फसला.

## संक्रांतपर्वात बचतगटाच्या महिलांचे दानाचे वाण; सैनिक कल्याण निधीसाठी १० हजारांचे योगदान

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महिला बचत गटातील महिलांनी आपले दातृत्व दाखवित सैनिक कल्याण निधीसाठी १० हजार रुपयांचे योगदान दिले आहे. सैनिक कल्याणासाठी योगदान देऊन महिलांनी संक्रांत पर्वात दानाचे वाण लुटले आहे. सैनिक कल्याण निधीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्याकडे या महिलांनी आज धनादेश सुपूर्द केला.



महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत कार्यरत लोक संचलित साधन केंद्राअंतर्गत काम करणाऱ्या महिला बचत गटाच्या सदस्य महिलांनी १० हजार रुपयांचे आपले योगदान सैनिक कल्याण निधीस दिले.

प्रगती लोकसंचलित साधन केंद्र लासूर स्टेशन, सावित्रीबाई लोकसंचलित साधन केंद्र, वाळूज, तेजस्विनी लोकसंचलित साधन केंद्र, गंगापूर, एकता लोकसंचलित साधन केंद्र, पैठणच्या संलग्न बचत गटातील महिलांनी प्रत्येक केंद्रामार्फत अडीच हजार रुपये असे एकूण १० हजार रुपये धनादेशाद्वारे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्याकडे सुपूर्द केले.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी या महिलांच्या दातृत्वाचे कौतुक केले.

निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख, महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हासमन्वयक चंदनसिंग राठोड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालविकास) श्रीमती सुवर्णा जाधव, महिला बालविकास अधिकारी श्रीमती रेश्मा चिमंद्रे आदी यावेळी उपस्थित होते.

पान १ वरून

## शस्त्रक्रियेनंतर सैफची प्रकृती स्थिर; तपासासाठी दहा पथके ; एक कोटीची मागणी करत सैफवर हल्ला

धावल्या असता आरोपीने त्यांच्यावर हल्ला केला. त्यावेळी सैफ अली खान व करीना दोघेही तेथे पोहोचले. त्यावेळी सैफवर हल्ला केला. तैमुरची आया लिमा या देखील मध्ये पडल्या. आरोपींच्या हल्यात त्याही जखमी झाल्या आहेत.

एक कोटींची मागणी

सैफ्फ अली खानचा मुलगा जहांगीरच्या खोलीत चोरटा शिरला. त्या खोलीत दोन महिला कर्मचारी झोपल्या होत्या. यातील एका महिला कर्मचाऱ्याला त्याने आधी शांत राहण्यास सांगून धमकावले. तसेच १ कोटी रुपये मागितले. त्यावेळी लिमा या सैफच्या लहान मुलाला घेण्यासाठी गेल्या असता आरोपीने त्यांच्यावर हल्ला केला.

सहा जखमा, दोन गंभीर

ही घटना मध्यरात्री अडीचच्या सुमारास घडली. सैफ अली खानला एकूण सहा जखमा झाल्या आहेत. दोन गंभीर स्वरूपाच्या आहेत. प्रामुख्याने त्याच्या पाठीवर, एक मणक्याजवळ असलेली जखम गंभीर आहे. त्याच्या मानेवर एक किरकोळ जखम आहे, तर उर्वरित जखम किरकोळ स्वरूपाची आहे. सैफवर लीलावती रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली असून त्याची प्रकृती स्थिर आहे. हल्ल्यावेळी सैफच्या घरात पत्नी करीना कपूर, दोन मुलगे व तीन महिला कर्मचारी असे सात जण होते.

## यूजीसीच्या दोन अधिसूचना चर्चाग्रस्त ठरताहेत

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) प्रसिद्ध केलेल्या दोन अधिसूचनांची सध्या शिक्षणविश्वात चर्चा सुरू आहे. 'यूजीसी'कडून दिल्या जाणाऱ्या अनुदानासह काही विशेष सुविधा आणि महाविद्यालयांना स्वायत्ततेसारखे विशेषाधिकार प्राप्त करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांनी 'नवीन शैक्षणिक धोरणा'ची अंमलबजावणी कशी केली, याचे मूल्यमापन होईल, ही त्यातील पहिली. मुळात राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषद अर्थात 'नॅक'सारखी स्वतंत्र संस्था उच्च शिक्षण संस्थांच्या मूल्यांकनासाठी कार्यरत असताना, 'यूजीसी'ने मूल्यमापनासाठी अन्य काही निकष तयार करण्याचा प्रयत्न का करावा, असाच प्रश्न आहे. त्यामुळे याला विरोध होणार हे स्वाभाविक आहे.

दुसरी अधिसूचना आहे, ती महाविद्यालये व विद्यापीठांतील प्राध्यापक भरती, पदोन्नती आणि विद्यापीठातील कुलगुरूंच्या निवडीच्या संदर्भात. या संदर्भात, नव्या अधिनियमांचा एक मसुदा तयार करण्यात आला आहे आणि या प्रस्तावित तरतुदींवर येत्या ५ फेब्रुवारीपर्यंत सूचना मागविण्यात आल्या असून, त्यांचा विचार करून या अधिनियमांना अंतिम स्वरूप दिले जाईल. 'यूजीसी'च्या या प्रस्तावित मसुद्यातील प्राध्यापक, प्राचार्य निवड-पदोन्नती आणि कुलगुरू नियुक्ती याबाबतच्या तरतुदी व्यवस्थितपणे अभ्यासाव्या लागणार आहेत. त्यात कंत्राटी प्राध्यापक नेमण्याच्या कमाल संख्येवरील, प्राध्यापकांच्या एकूण जागांपैकी १० टक्के, ही अट काढून टाकली आहे. म्हणजे आता जितक्या जागा रिक्त, तितके कंत्राटी प्राध्यापक नियुक्त करता येतील. हे असे केल्याने नियमित प्राध्यापकांच्या जागा भराव्या न लागून त्यांना द्यावयाच्या लाभाचे पैसे वाचतील, असा तर हा विचार नाही ना, असा प्रश्न पडतो. यामुळे उच्च शिक्षणाचे आणखी खासगीकरण होऊ शकेल. सहायक प्राध्यापक नेमणुकीसाठी निकषांचे तीन पर्याय आहेत. पीएच.डी. वा नेट-सेट पात्रता हवी, असे पहिले दोन पर्याय आहेत. तिसरा पर्याय मात्र पदव्युत्तर पदवीला ५५ टक्के एवढी पात्रताही पुरेल, असे सांगतो. या प्रस्तावित अटींमुळे बरेच वादंग होत आहेत. चांगला शैक्षणिक दर्जा असलेल्या विद्यापीठातून ५५ टक्के गुणांनी पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेला विद्यार्थी आणि चांगला शैक्षणिक दर्जा नसलेल्या विद्यापीठातून ५५ टक्के गुणांनी पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेला विद्यार्थी यांच्यात समानता कशी राहील? त्याचप्रमाणे खासगी विद्यापीठे आणि शासकीय विद्यापीठे यांच्या पदव्युत्तर पदवीमध्ये साम्य कसे असेल? शिवाय, शिकविण्याचे कौशल्य, संवाद कौशल्य याचाही प्राध्यापक निवडीत विचार केला पाहिजे. त्यांचा विचार अधिसूचनेत नाही. नेट-सेटची अट अत्यंत महत्त्वाची आहे. ती वगळू नये. पीएच.डी.बाबतीतही अनेक गैरप्रकार झालेले आहेत, होतात. अनेक विद्यापीठांमध्ये पीएच.डी. पदवी मिळविण्यात महिला विद्यार्थ्यांना त्रास होतो. अनेक विद्यापीठांमध्ये तर बोगस पद्धतीने पीएच.डी. दिलेल्या आहेत.

प्रस्तावित तरतुदींमधील कुलगुरू निवडीच्या निकषांवरून आणि पद्धतीवरून मात्र वादंग निर्माण होत असल्याचे दिसते. कुलगुरूपदाची निवड करताना, त्यासाठी नेमायच्या शोध समितीचे अधिकार कुलपतींकडे देण्याचे प्रस्तावित आहे. कुलपती म्हणजे पर्यायाने राज्यपालांकडे अधिकार, आणि राज्यपाल केंद्राने नेमलेले असल्याने कुलगुरू निवडीत थेट केंद्राचा राजकीय हस्तक्षेप होतील, असे वाटते. त्यामुळे या तरतुदीचे योग्य असे स्पष्टीकरण 'यूजीसी'ला द्यावे लागेल. पण, कुलगुरू निवडीतील राजकीय हस्तक्षेप हा विषय जुना आहे, तो आताच उपस्थित झाला आहे, असे नाही. यामुळे यापूर्वीही अनेक विद्यापीठांना अकार्यक्षम कुलगुरू मिळालेले आहेत. प्रस्तुत लेखकाला महाराष्ट्राच्या त्या-त्या वेळच्या राज्यपालांनी चार वेळा कुलगुरूपदाच्या मुलाखतीसाठी बोलावले होते. परंतु, कुलगुरूपदाचे निकष पूर्ण करीत असतानादेखील राजकीय हस्तक्षेपामुळे कुलगुरू म्हणून नियुक्ती होत नाही, असा अनुभव आहे. माझ्यासारख्याच इतर अनेक गुणवंत व्यक्तींना या अनुभवाला सामोरे जावे लागले आहे. कुलगुरूपदासाठी अध्यापनाची सक्ती काढून टाकण्यात आली आहे हे मात्र योग्य आहे. एखाद्या आस्थापनेत नेतृत्व केलेल्याला, संशोधनाची आवड असलेल्या आणि शैक्षणिक विषयाबाबत स्वारस्य असलेल्यालाही आता कुलगुरू होण्याची संधी आहे. विशेषतः गेल्या काही वर्षांत कुलगुरूंच्या कामाचे स्वरूप केवळ शैक्षणिक राहिलेले नसताना आणि कुलगुरूंना आर्थिक, शैक्षणिक, प्रशासकीय अशा वेगवेगळ्या स्तरांवर आपली योग्यता सिद्ध करणे आवश्यक असताना हे बदल सकारात्मक वाटतात. तरीही, उद्योग वा सार्वजनिक क्षेत्रातून व्यक्ती निवडण्यासाठीचे निकष काटेकोर असायला हवेत आणि त्यांचीही तपशीलवार वाख्या केली पाहिजे, हे लक्षात ठेवले पाहिजे.

कंपनी-संस्थेची उलाढाल, हाताळावे लागणारे किमान मनुष्यबळ, नेतृत्व करणाऱ्याचे पद (मुख्य कार्यकारी अधिकारी, संचालक, सरव्यवस्थापक आदी) असे काही ठोस आणि काटेकोर निकष असले पाहिजेत. शिवाय, त्या व्यक्तीच्या शैक्षणिक पात्रतेचाही विचार झाला पाहिजे. त्याचप्रमाणे सार्वजनिक विद्यापीठांच्या निरनिराळ्या अधिकार मंडळांचा अनुभव कुलगुरूपदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीस हवा. अनेक तज्ज्ञ हा अनुभव नसल्याने 'कुलगुरू' म्हणून अपयशी झालेले आहेत. यापुढे 'कुलगुरू' म्हणजे शिक्षण/संशोधन यातील तज्ज्ञ व्यक्ती हवी. विद्यापीठ प्रशासनासाठी आयएएस दर्जाचा अधिकारी नियुक्त करणे योग्य होईल, असे वाटते. सार्वजनिक विद्यापीठांतील अधिकारांचे विकेंद्रीकरण केल्यामुळे विद्यापीठांना फायदाच होईल.

लेखक महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू; तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांवर कामाचा अनुभव असलेले पुण्यातील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष आहेत.

# सोमनाथ सुर्यवंशी यांचा परिवाराला समाजाने सरळ हाताने आर्थिक मदत करावी

## नारायण बागडे सरांचे आवाहन



**परभणी (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जेव्हा जेव्हा आंबेडकरी अस्मितेचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा तेव्हा हा भिम सैनिकांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन आंबेडकरी बाणा जिवंत ठेवला संविधानाच्या रक्षणासाठी सोमनाथ सुर्यवंशी यांनी आपल्या जिवाची बाजी लावून पोलिस अत्याचारात शहिद झाला समाजातील धनदांडगे यांनी सोमनाथ सुर्यवंशी यांचा परिवाराला आर्थिक मदत करावी असे आवाहन आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी केली.ते परभणी येथील भिमगड या निवासस्थानी जाऊन त्यांच्या परिवाराची भेट घेण्यासाठी आले असता बागडे सरांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

सोमनाथ ची मातोश्री यांनी आपल्या मुलांच्या दुःखाचे कथन केले असता डोळ्यात अश्रू उभे राहिले सोमनाथला फार शिक्षणाची फार आवड होती तो घरी मोठा मुलगा होता काबाडकष्ट करून त्यांनी आपल्या दोघा भावांना उच्चशिक्षित केले तो पण वकिलीची परिक्षा उत्तीर्ण होऊन आपल्या व्यवसायात यशस्वी भरारी घेवुन सम ाजाची सेवा करून संविधानाने दिलेल्या लोकशाहिचा रक्षणासाठी कायद्याचे दान गोरगरिबांना देणार होता परंतु अचानक त्यांच्या जीवनात मोड आला संविधानाच्या अस्मितेसाठी परभणी निघालेल्या मोर्चात सहभागी झाला संविधानाच्या रक्षक संविधानाच्या रक्षणासाठी शहिद झाला त्या माऊलीने शासनाची आर्थिक मदत नाकारून मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा ठोठावली पाहिजे तेव्हाच सोमनाथ चे स्वप्न पूर्ण होईल हा टोहफोडला आता बघू या सत्तेची मलाई खाणारे आमच्यातले किती नेते सोमनाथला न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतात. या प्रसंगी आंरिमो परभणी जिल्हा अध्यक्ष शिवाजीराव सुंगधे,सुरदास अंभोरे, राजीव कांबळे हे उपस्थित होते

# मानसिंग बापू पवार, सेवानिवृत्त विंग कमांडर जाधव सर व छत्रपती संभाजीनगर मराठा समाज प्रतिष्ठान यांची सारथी मुख्यालयाला भेट



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आदरणीय श्री.मानसिंग बापू पवार व सेवानिवृत्त विंग कमांडर श्री.जाधव सर यांच्या नेतृत्वात छत्रपती संभाजीनगर मराठा समाज प्रतिष्ठान यांनी पुण्यातील सारथी मुख्यालयाला भेट दिली!

सारथी मुख्यालयाच्या पाहणीनंतर संपन्न झालेल्या बैठकीत सारथीचे अध्यक्ष श्री.अजित निंबाळकर, श्री.उमाकांत दांगट, श्री.कोकाटे सर, श्री.पासलकर सर व्यवस्थापकीय संचालक श्री.अशोक काकडे, पुणे येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

आदरणीय श्री.मानसिंग बापू पवार यांनी सारथी विभागातील कर्मचाऱ्यांना मराठा समाज प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी उपक्रमांची माहिती दिली.तसेच श्री. अशोक काकडे यांनी सारथीच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या योजना आणि त्यांची आतापर्यंतची वाटचाल याबाबत सादरीकरण केले. यावेळी सारथीचे अध्यक्ष श्री.अजित निंबाळकर सरांनी सारथीच्या योजना 'मराठा समाज प्रतिष्ठान' च्या सर्व सन्माननीय सदस्यांनी समाजातील प्रत्येक युवकापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले.. 'मराठा समाज प्रतिष्ठान'च्या सर्व सदस्यांनी सारथीच्या नवनिर्मित वास्तूचे कौतुक केले.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने आयोजित होणाऱ्या राज्यस्तरीय कबड्डी, खोखो, कुस्ती, व्हॉलीबॉल या चार स्पर्धांच्या आयोजनासाठी आता एक कोटींचा निधी- उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई** – राज्य शासनाचे क्रीडा व युवक सेवा संचालनालय आणि महाराष्ट्र क्रीडा असोसिएशन यांनी बारामती येथे संयुक्तपणे आयोजित केलेल्या २३ व्या 'छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धांचे' चे उद्घाटन आज सायंकाळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन समारंभावेळी, स्पर्धेत सहभागी खेळाडू, मार्गदर्शक, प्रशिक्षक, कबड्डी रसिकांशी संवाद साधताना उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी, महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने आयोजित होणाऱ्या कबड्डी, खोखो, कुस्ती आणि व्हॉलीबॉल या चार राज्यस्तरीय स्पर्धांसाठी दिले जाणारे ७५ लाख रुपयांचे अनुदान वाढवून ते एक कोटी करण्याची घोषणा केली.

उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या या घोषणेमुळे देशी खेळांच्या प्रचार-प्रसार आणि खेळाडूंच्या विकासाला अधिक बळ मिळणार आहे. उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या या घोषणेचे क्रीडा जगतातून स्वागत होत आहे.

# १९ जानेवारीला शहरात भव्य लोककला महोत्सव भीमगीतांच्या बहारदार मैफलचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

कै. पुंजाजी बाबा प्रतिष्ठान, लोककला विकास मंच आणि बाबा दळवी विचार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, १९ जानेवारी २०२५ रोजी एन-११ मधील राष्ट्रवादी भवन, नवजीवन कॉलनी येथे भव्य लोककला महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त बहारदार भीमगीतांची मैफल सादर होणार आहे.

महोत्सवात पारंपरिक लोककलावंत, शाहीर, कवी, गायक, वादक, पोतराज, आराधी, जागरण-गोंधळ आदी कलावंत सहभागी होणार आहेत. लोककलांतांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी महोत्सवात मान्यवरांच्या उपस्थिती चर्चाविमर्ष होणार आहे.

१९ जानेवारी सकाळी ९ वा. टीव्ही सेंटर चौकातून लोककलावंतांची पारंपरिक वेशभूषेत भव्य मिरवणूक काढण्यात येईल. विविध लोककला आविष्कार सादर करत मिरवणूक कार्यक्रमस्थळी राष्ट्रवादी भवनात पोहचेल. तेथे लोककला महोत्सवाचे उद्घाटन होईल.

याप्रसंगी खासदार डॉ. कल्याण काळे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, राकाँचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग तायडे, प्रख्यात समीक्षक डॉ. ऋषिकेश कांबळे, पोलीस उपायुक्त नितीन बगाटे, अधीक्षक अभियंता एस. एस. भगत, सेवादलाचे अध्यक्ष विलास औताडे, वैजापूरचे माजी न. प. अध्यक्ष दिनेश परदेशी, वैजापूर मर्चंट बँकेचे चेअरमन बाळासाहेब संचेती, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे सहायक संचालक संदीप शेंडे आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.




**नामंवत कलावंत**

सकाळी ११ ते सायंकाळी ४ वाजेदरम्यान लोककलांवतांना कलाविष्कार सादर करतात येतील. त्यानंतर लोकगीत गायक कडूबाई खरात, सुनील खरे, कुणाल बोधडे, अजय देहाडे, मेघानंद जाधव, अरुण खरात, धोंडीरामसिंह राजपूत, चार्ली सोमनाथ सोभावणे आदी कलावंतांच्या संचालत भीम गीतांची बहारदार मैफल यावेळी सादर होणार आहे.

सहभागी सर्व लोककलांवतांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्हांसह प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येईल.

शहर आणि जिल्ह्यातील लोककलावंतांनी महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पुंजाजी बाबा प्रतिष्ठानचे अध्यक्ष ज्येष्ठ शाहीर एकनाथ त्रिभुवन आणि बाबा दळवी विचार मंचचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार स. सो. खंडाळकर यांनी केले आहे.

# राज्य निवडणूक आयुक्तांच्या निवडीचे सर्वाधिकार देवेंद्र फडणवीस यांना; स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी मंत्रिमंडळाचा निर्णय

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मुंबईत झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राज्य निवडणूक आयुक्त पदाच्या उमेदवाराची शिफारस करण्याचे सर्वाधिकार देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. याबाबतची माहिती प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली आहे. यापूर्वी, राज्यमंत्र्यांसह मंत्रिमंडळाला राज्य निवडणूक आयुक्त पदासाठी मुख्यमंत्र्यांकडे नावाची शिफारस करण्याचे अधिकार होते, त्यानंतर मुख्यमंत्री ते नाव राज्यपालांकडे पाठवायचे. पण मंत्रिमंडळाच्या निर्णयामुळे आता मुख्यमंत्री राज्यपालांना थेट उमेदवाराची शिफारस करतील.

राज्यातील बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थांवर सध्या प्रशासक आहेत. तसेच येत्या काही महिन्यांत या स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे मंत्रिमंडळाने घेतलेल्या या निर्णयाला महत्व प्राप्त झाले आहे. दरम्यान राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगाद्वारे घेण्यात येतात.

**स्थानिक स्वराज्य संस्थांवर महायुतीचे लक्ष**

विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळविल्यानंतर आत्मविश्वास दुणावलेल्या महायुतीने आता स्थानिक स्वराज्य संस्थांवर लक्ष केंद्रीत केले आहे. पावसाळ्यापूर्वी या निवडणुका घेण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी या निवडणुका घेण्याची जबाबदारी असलेल्या राज्य निवडणूक आयुक्तांच्या नावाच्या शिफारशीबाबत आजची मंत्रिमंडळाची बैठक बोलविण्यात आली होती.

राज्य निवडणूक आयुक्त युपीएस मदान सप्टेंबरमध्ये निवृत्त झाल्यापासून हे पद रिक्त असून, नव्या आयुक्तांची निवड गेल्या काही महिन्यांपासून रखडली आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य निवडणूक आयुक्तपदाच्या निवडीची प्रक्रिया सरकारने राबविली. दरम्यान, आयुक्तपदासाठी माजी मुख्य सचिव नितीन करीर, मुंबई पोर्ट ट्रस्टचे(बीपीटी) माजी अध्यक्ष राजीव जलोटा, नियोजन विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वैद्यकीय शिक्षण विभागाचे अप्पर मुख्य सचिव दिनेश वाघमारे यांच्यासह डझनभर सनदी अधिकारी इच्छुक आहेत. सरकारी होमिओपॅथी महाविद्यालयाची जागा बदलली

आज मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयांपैकी दुसरा निर्णय कागल तालुक्यातील सरकारी होमिओपॅथी महाविद्यालयाबाबतचा आहे. मंत्रिमंडळाने कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील सांगाव येथे होणारे सरकारी होमिओपॅथी म हाविद्यालय आणि रुग्णालय पिंपळगाव खुर्द येथे हलवण्याचा निर्णय घेतला आहे. याचबरोबर यासाठी जमीन हस्तांतरित करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. दरम्यान ऑक्टोबर २०२४ मध्ये गेल्या सरकारच्या कार्यकाळात कागल तालुक्यातील सांगाव येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे सरकारी होमिओपॅथी महाविद्यालय आणि ५० खाटांचे रुग्णालय स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. याच्या जागेत आता बदल करण्यात आला आहे.

# 'लखपती दिदी'च्या माध्यमातून मिळेल महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणास बळ-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

केंद्र शासनाच्या 'लखपती दिदी' या योजनेअंतर्गत ग्रामीण भागात महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक उत्पन्नात वाढ होऊन महिलांचे आर्थिक सक्षमीकरणास बळ मि ळणार आहे. तरी या योजनेच्या अंमलबजावणीस गती द्यावी,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे दिले.

लखपती दिदी सुकाणू समि तीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. म हानगरपालिका आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अशोक शिरसे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख, महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक चंदनसिंग राठोड, जिल्हा शिक्षणाधिकारी(योजना) अरुणा भूमकर, जिल्हा महिला बालविकास अधिकारी रेश्मा चिमंद्रे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजनांची अंमलबजावणी ग्रामीण पातळीवर करावी. यात महिला सुरक्षा, मुलींचा जन्मदर वाढवणे, त्याचप्रमाणे महिलांसाठी सुरक्षित वातावरण आणि महिलांच्या आर्थिक विकासासाठी त्यांना शिक्षण, प्रशिक्षण आणि व्यवसाय वृद्धीसाठी समन्वय आवश्यक आहे.यासाठी विविध उपक्रम ांचे आयोजन जिल्हा महिला बालविकास विभागामार्फत करण्यात यावे. 'लखपती दिदी' या योजनेअंतर्गत दिलेले उद्दिष्ट म ार्चअखेर पूर्ण करावे. आजीविका या पोर्टल वरील सर्व नोंदी अद्यावत कराव्या. लखपदी दिदी योजनेत ग्रामीण भागातील जास्तीत जास्त महिलांनी सक्रिय सहभाग घ्यावा. महिलांना भांडवल आणि बँकांचे सहकार्य, सूक्ष्म गुंतवणूक, उत्पादक गटांची स्थापना, आणि सेंद्रिय शेती गटाची स्थापना यास प्राधान्य देऊन विविध शासनाच्या योजनांची अंमलबजावणी एकत्रित करून महिलांचे आर्थिक उत्पन्न जास्तीत जास्त वाढावे यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

# रासायनिक दुर्घटनेचे आपत्ती व्यवस्थापन प्रात्यक्षिक; ३०० जणांचा सहभाग



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्हास्तरीय रासायनिक दुर्घटना आपत्ती व्यवस्थापन प्रात्यक्षिक आज एचपीसीएल कंपनीच्या आवारात आयोजित करण्यात आले. या आपत्ती व्यवस्थापन प्रात्यक्षिकात ३०० जणांनी सहभाग घेतला.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्रतिसाद दलाच्या वतीने हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. रासायनिक दुर्घटनेत विविध शासकीय, निमशासकीय, व इतर विभागांमध्ये समन्वय कसा साधला जावा, त्यांच्या जबाबदाऱ्या व रासायनिक दुर्घटनेत आपत्ती व्यवस्थापन कार्य हाताळणी याबाबत हे प्रात्यक्षिक होते. यावेळी निदर्शनास येणारे अडथळे, कमतरता यांचे विश्लेषण करून पुढील काळात त्यावर मात करणे इ. अभ्यास करण्यात आले.

तसेच आपत्ती व्यवस्थापना विषयी जनजागृती आणि संबंधित विभागांचे क्षमता वर्धन करण्यासाठी हे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले. अमोनिया गॅस टँकरचा अपघात व गॅस गळती , ङझञ्च टँकरचा अपघात व गळती असे दोन घटनांचे प्रात्यक्षिक करण्यात आले. यात अग्निशमन विभाग त्यांचे दोन पथके सहभागी तसेच राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे एकूण ३२ जवान होते. त्यांची वेगवेगळी पथके तयार करण्यात आली होती.

साधन व्यक्ती विजय पाटील, राजू ठोंबरे, श्रीमती बेबी किरण अहिर, मेजर मर्डेकर कृष्णा यांच्या नेतृत्वात पथके प्रशिक्षण घेत होती.

याप्रशिक्षणात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी मारुती मस्के, सहायक कमांडट निखिल मुधोळकर, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य सहसंचालक प्रमोद सुरसे, उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा खिरोडकर, अग्निशमन विभाग प्रमुख पाटील, अमित दगडे, अमिलेश राव तसेच आरोग्य विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, वाहतुक विभाग, पोलीस दल इत्यादी विभागाचे ३०० हून अधिक व्यक्तिंनी या प्रशिक्षणात सहभाग घेतला.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816